# THE BOMBAY PREVENTION OF GAMBLING ACT, 1887
## [Bom. IV of 1887]

## [मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७]

अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| प्रस्तावना. | | |
| कलमें. | | |
| १. | लघु संज्ञा ... ... ... ... ... ... ... | ५३७ |
| | व्याप्ति ... ... ... ... ... ... ... ... | ५३७ |
| २. | [रद्द करण्यांत आले]... ... ... ... ... ... ... | ५३७ |
| ३. | "जुगार खेळणें" या संज्ञेची व्याख्या ... ... ... ... ... | ५३७ |
| | "जुगार खेळण्याची साधनें" या संज्ञेची व्याख्या .. ... ... ... | ५३७ |
| | "जुगार खेळण्याचा सार्वजनिक अड्डा" या संज्ञेची व्याख्या ... ... ... | ५३८ |
| ४. | जुगार खेळण्याचे सार्वजनिक अड्डे ठेवणें ... ... ... ... | ५३९ |
| ५. | जुगाराच्या सार्वजनिक अड्ड्यांत जुगार खेळणें ... ... ... ... | ५३९ |
| ६. | जुगार खेळण्याच्या अड्ड्यामध्यें पोलिस अधिकाऱ्यांनी प्रवेश करणें, झडती घेणें, इत्यादि | ५४० |
| ७. | जुगार खेळण्याचा सार्वजनिक अड्डा ठेवण्याचा किंवा त्यांत जुगार खेळण्याचा अनुमानिक पुरावा. | ५४१ |
| ८. | जुगाराचा सार्वजनिक अड्डा ठेवल्याबद्दल किंवा त्यांत जुगार खेळल्याबद्दल दोषी ठरविण्यांत आल्यावर जुगार खेळण्याची साधनें नष्ट करण्याचा अधिकार. | ५४१ |
| ९. | दोषी ठरविण्यासाठीं पैसे लावून खेळण्याचा पुरावा देण्याची आवश्यकता नाहीं ... | ५४१ |
| १०. | ज्या संबंधित इसमांची साक्षीदार म्हणून तपासणी झाली असेल अशा इसमांचा बचाव | ५४१ |
| ११. | दंडाच्या रकमेचा कांही भाग माहिती देणारास देणें ... ... ... | ५४२ |
| १२. | सार्वजनिक रस्त्यांत जुगार खेळणें, पक्षीं व जनावरें लढविणें या बाबतींत अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार. | ५४२ |
| | सांपडलेली साधनें जप्त करणें व त्यांचा नाश करणें ... ... ... ... | ५४२ |
| १२-अ. | कोणतीहि बातमी किंवा माहिती छापणें, प्रसिद्ध करणें किंवा वाटणें याबद्दल अधिपत्राशिवाय धरण्याचा अधिकार. | ५४३ |
| १३. | ज्या खेळांत केवळ कौशल्य असते अशा खेळांचा बचाव ... ... ... | ५४३ |
| | अनुसूचि [रद्द करण्यांत आली] ... | |

# सन १८८७, मुंबई अधिनियम क्रमांक ४*

(मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७)

[५ जानेवारी १८८८]

हा अधिनियम सन १८९५ चा मुंबई अधिनियम १६, या अन्वयें अंशत: रद्द करण्यांत आला असून त्यांत पुढील आदेश व अधिनियम या अन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १८९० चा मुंबई अधिनियम १.

सन १९१० चा मुंबई अधिनियम १.

सन १९१९ चा मुंबई अधिनियम ६.

सन १९२२ चा मुंबई अधिनियम ५.

सन १९२६ चा मुंबई अधिनियम ५.

सन १९२९ चा मुंबई अधिनियम १४.

सन १९३१ चा मुंबई अधिनियम ३.

सन १९३४ चा मुंबई अधिनियम १२.

सन १९३६ चा मुंबई अधिनियम १.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४१ चा मुंबई अधिनियम २.

सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम ३७.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम ६०.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम १४.

## मुंबई राज्यांत जुगार खेळण्यास प्रतिबंध करण्यासंबंधीं असलेला विधि एकत्रित करण्याबाबत व त्यांत सुधारणा करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई राज्यांत जुगार खेळण्यास प्रतिबंध करण्यासंबंधीं असलेला विधि हा, एकत्रित करणें व त्यांत सुधारणा करणें इष्ट आहे ; त्याअर्थी याअन्वयें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :— प्रस्तावना.

१. ह्या अधिनियमास मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ असें म्हणावें. लघुसंज्ञा.

तो संबंध मुंबई राज्यांस लागू आहे. व्याप्ति

२. (अधिनियम रद्द करणें) हें कलम सन १८९५ चा अधिनियम, १६ या अन्वयें रद्द करण्यांत आलें.

३. ह्या अधिनियमांत, "जुगार खेळणें" या संज्ञेंत, घोड्याच्या शर्यतीत :— जुगार खेळणें या संज्ञेची व्याख्या

(अ) ज्या दिवशीं अशी शर्यत व्हावयाची असेल त्या दिवशी, आणि

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला

(ब) ज्या शर्यतीच्या जागीं अशी शर्यत व्हावयाची असेल अशा जागेच्या लैसेंसदारानें जे आवार मुंबईचा शर्यतीच्या जागांना लैसेंस देण्याबाबतचा अधिनियम, १९१२ कलम ४ अन्वयें दिलेल्या लैसेन्सांतील अटींअन्वयें अशा कारणांकरितां शर्यतीच्या जागे संबंधानें राखून ठेवले असेल त्या आवारांत, आणि

(क) आवारांत हजर असलेला स्वत: कोणताहि इसम व दुसऱ्यापक्षीं असा लैसेन्स धारण करणारा इसम किंवा अशा लैसेन्स धारण करणाऱ्या इसमानें उपरिनिर्दिष्ट लैसेन्साच्या अटींस अनुसरून परवानगी दिलेला इतर इसम यांच्या दरम्यान किंवा जातीनें कितीहि इसमांच्या दरम्यान अशा लैसेन्सानें परवानगी देण्यांत येईल अशा रीतीनें व अशा साधनानें, पैज मारण्यांत येईल किंवा सट्टा खेळण्यांत येईल ती पैज किंवा सट्टा खेरीजकरून, पैज मारणें किंवा सट्टा खेळणें यांचा समावेश होतो ; परंतु तींत (लॉटरीचा) सोडतीचा समावेश होत नाहीं.

ज्या कोणत्याहि व्यवहारांत एखादा इसम कोणत्याहि नात्यानें दुसऱ्या इसमांस कोणत्याहि नात्यानें अशा लैसेन्सदाराशीं किंवा इतर कोणत्याहि इसमांशीं पैज मारण्याचा किंवा सट्टा खेळण्याच्या कामावर लावील किंवा दुसऱ्या कोणासाठीं कोणत्याहि नात्यानें असें काम करण्याचें कबूल करील असा व्यवहार "जुगार" आहे असें समजावें.

परंतु, अशा लैसेंदारास अशा लैसेन्सांत परवानगी देण्यांत येईल अशा रीतीनें किंवा अशा साधनानें पैज मारण्यांकरितां किंवा सट्टा करण्याकरितां नोकर ठेवण्याचा अधिकार आहे व लोकांस अशा कामासाठीं अशा लैसेन्सदाराजवळ नोकरी करण्याचा अधिकार आहे. सट्टे घेणें किंवा सट्टे लावण्यांसाठीं विनविणें किंवा सट्टयाच्या किंवा पैजेच्या संबंधांत किंवा सट्टयाच्या किंवा पैजेच्या कामास मदत करण्याच्या किंवा ते काम सुलभ होण्याच्या इराद्यानें केलेले कोणतेहि कृत्य या संबंधांत पैशाचें रूपानें किंवा अन्य रीतीनें विनिग्ज (नंबर लागल्यामुळे मिळणारा पैसा) किंवा बक्षिसें घेणें किंवा तीं वाटणें किंवा असे (सट्टे) घेणें, त्यासाठीं विनविणें, घेणे किंवा वाटणें हीं सर्व कृत्ये "जुगार" असल्याचें समजण्यांत आले पाहिजे.

जुगार खेळण्यांची साधने या संज्ञेची व्याख्या.

ह्या अधिनियमांतील "जुगार खेळण्याची साधनें" या संज्ञेत, जुगार खेळण्याचा विषय म्हणून किंवा साधन म्हणून ज्या कोणत्याहि वस्तूचा उपयोग केला असेल किंवा उपयोग करण्याचा हेतु असेल त्या वस्तूचा, नोंदणी पुस्तक म्हणून, नमूद करावयाचा म्हणून किंवा कोणत्याहि जुगाराचा पुरावा म्हणून उपयोगांत आणलेला किंवा उपयोगांत आणावयाचा कोणताहि लेख, कोणत्याहि जुगाराचे उत्पन्न आणि कोणत्याहि जुगाराच्या संबंधांतील पैशाच्या स्वरूपांतील अन्य स्वरूपांतील वाटून दिलेली किंवा वांटण्याचा इरादा असलेली कोणतीहि विनिग्ज किंवा बक्षिसें यांचा समावेश होतो.

या अधिनियमांत "जुगाराचा सार्वजनिक अड्डा" या संज्ञेचा अर्थ :—

(१) (अ) कापूस, अफू किंवा इतर वस्तु यांच्या बाजार किंमतीवर किंवा अशी किंमत सांगतांना वापरलेल्या संख्येतील आंकड्यावर, किंवा

(ब) अशा कोणत्याहि वस्तूच्या बाजार किंमतींत होणारा बदल याच्या रकमेवर किंवा अशी किंमत सांगतांना वापरलेल्या संख्येतील आंकड्यांवर, किंवा

(क) कोणत्याहि कर्जरोख्याच्या किंवा शेअर्सच्या बाजार किंमतीवर किंवा अशी किंमत सांगतांना वापरलेल्या संख्येतील आंकड्यांवर, किंवा

(ड) पाऊस किंवा इतर नैसर्गिक घटना घडून येणें किंवा न येणें यांवर, किंवा

(इ) पर्जन्यवृष्टीच्या प्रमाणावर किंवा असें प्रमाण सांगतांना वापरलेल्या संख्येतील आंकड्यावर, जुगार खेळण्याच्या बाबतींत, असा जुगार ज्या ठिकाणीं खेळला जाईल किंवा अशा जुगाराचीं साधनें ज्यांत ठेवण्यांत येतील किंवा वापरलीं जातील असें कोणतेंहि घर, खोली किंवा जागा असा समजावा.

(२) इतर कोणत्याहि प्रकारच्या जुगाराच्या बाबतींत, ज्या एखाद्या घरांत, खोलींत किंवा जागेंत जुगार खेळण्याची कोणतीहि साधनें, अशा घराचा, खोलीचा किंवा जागेचा मालक असणाऱ्या, तिचा भोगवटा करणाऱ्या, ती वापरणाऱ्या किंवा ती ठेवणाऱ्या इसमांस असें घर, खोली किंवा जागा किंवा साधन यांच्या उपयोगासाठीं आकाराच्या रूपानें किंवा इतर कोणत्याहि रीतीनें होणाऱ्या फायद्या करितां ठेवलीं असतील किंवा वापरली जात असतील असें कोणतेहि घर, खोली किंवा जागा, असा समजावा.

ह्या अधिनियमांत "जागा" या संज्ञेंत, "तंबू, परिवेष्टित जागा, क्षेत्र, वाहन आणि "जागेची" व्याख्या जलयान" यांचा समावेश होतो".

४. जो कोणी इसम :—

जुगार खेळण्याचे सार्वजनिक अड्डे ठेवणें.

(अ) जुगार खेळण्याचा सार्वजनिक अड्डा म्हणून कोणतेहि घर, खोली किंवा जागा खुलीं करील ठेवील किंवा तिचा उपयोग करील ;

(ब) अशा कोणत्याहि घराचा, खोलीचा किंवा जागेचा मालक किंवा भोगवटा करणारा असून, तीं इतर कोणत्याहि इसमास वरनिर्दिष्ट केलेल्या कारणासाठीं जाणूनबुजून किंवा बुद्धि पुरस्सर खुली करूं देईल, तिचा भोगवटा करूं देईल, ती ठेवूं देईल किंवा तिचा उपयोग करूं देईल ;

(क) वर निर्दिष्टकेलेल्या कारणांसाठीं खुले केलेले, भोगवटयांत असलेले किंवा उपयोगांत असलेले असें कोणतेहि घर, खोली किंवा जागा यांतील कामाची व्यवस्था त्याजकडे असेल किंवा तें काम चालविण्यास कोणत्याहि रीतीनें मदत करील ;

(ड) अशा कोणत्याहि घरांत, खोलींत किंवा जागेंत नेहमी येणाऱ्या इसमांबरोबर जुगार खेळण्याच्या कारणांसाठीं पैसे अगाऊ देईल किंवा पुरवील, त्यास ;

दोषी ठरविण्यांत आले असतां, तो पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेच्या व दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

परंतु,

(अ) पहिल्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा एक महिन्याहून कमी असतां कामा नये व दंडाची रक्कम हीं दोनशें रुपयाहून कमी असतां कामा नये ;

(ब) दुसऱ्या वेळच्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा तीन महिन्याहून कमीं असतां कामा नये व अशी दंडाची रक्कम ही दोनशें रुपयाहून कमीं असतां कामा नये ; आणि

(क) तिसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा सहा महिने मुदती पेक्षां कमी असतां कामा नये व दंडाची रक्कम दोनशे रुपयाहून कमी असतां कामा नये.

जुगाराच्या सार्वजनिक अडयांत जुगार खेळणें.

५. कोणत्याहि जुगार खेळण्याच्या सार्वजनिक अड्डयाच्या ठिकाणीं जो कोणी इसम जुगार खेळतांना सांपडेल किंवा जुगार खेळण्याच्या कारणांसाठीं हजर असेल त्यास, दोषी ठरविण्यांत आले असतां तो पराकाष्ठा सहा महिने कैदेच्या शिक्षेस व दंडाच्या शिक्षेस पात्र होईल :

परंतु—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा एक महिन्याहून कमी असतां कामा नये व दंडाची रक्कम ही दोनशें रुपयांहून कमी असतां कामा नये ;

(ब) दुसऱ्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा तीन महिन्याहून कमी असतां कामा नये व दंडाची रक्कम ही, दोनशें रुपयांहून कमी असतां कामा नये ;

(क) तिसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा सहा महिन्यापेक्षां कमी असतां कामा नये व असा दंड दोनशें रुपयांहन कमी असतां कामा नये.

कोणत्याहि जुगार खेळण्याच्या सार्वजनिक अड्ड्याच्या ठिकाणीं कोणताहि जुगार खेळणें चालू असतांना त्या ठिकाणीं सांपडलेला कोणताहि इसम हा, तद्विरूद्ध सिद्ध करण्यांत आले नसेल तर, तो त्या ठिकाणीं जुगार खेळण्याच्या कारणांसाठीं हजर होता असें समजण्यांत आले पाहिजे.

जुगार खेळण्याच्या अड्यांत पोलिस अधिकाऱ्यांनी प्रवेश करणें, झडती घेणें, इ.

६. (१) बृहन्मुंबईत, उप-निरीक्षक यांच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या व लेखी स्वरूपांतील सामान्य आदेशाद्वारे अधिकार दिलेल्या किंवा प्रत्येक बाबतींत पोलिस कमिशनरानें दिलेल्या खास अधिपत्रान्वयें अधिकार दिलेल्या, पोलिस अधिकाऱ्यानें ; आणि

(२) इतर ठिकाणीं, प्रत्येक बाबतींत जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें किंवा उप-विभागीय फौजदारी न्यायाधिशानें किंवा याबाबतींत राज्य सरकारनें खास रीतीनें अधिकार दिला असेल अशा तालुका फौजदारी न्यायाधिशानें आणि राज्य सरकारनें खास रीतीनें अधिकार दिला असेल अशा जिल्हा पोलीस अधीक्षक यानें किंवा जिल्हा पोलीस सहाय्यक अधीक्षक किंवा उप–पोलीस अधीक्षक यानें दिलेल्या खास अधिपत्रान्वयें अधिकार दिलेल्या पोलीस उप-निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या पोलीस अधिकाऱ्यानें ;—

(३) वरील कंडिका (२) मधील उपबंधांस बाध न आणतां, राज्य सरकार, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, तिच्याद्वारें याबाबतींत निर्दिष्ट करील अशा इतर क्षेत्रामध्यें, उप-निरीक्षकाच्या हुद्याहून कमी हुद्दा नसेल आणि जिल्हा फौजदारी न्यायाधिशानें लेखी स्वरूपांत दिलेल्या सामान्य आदेशान्वयें ज्यास अधिकृत केले असेल अशा अधिकाऱ्यानें ;

(अ) जुगार खेळण्याचा सार्वजनिक अड्डा म्हणून उपयोग करण्यांत येत आहे असा संशय येण्यास त्यास कारण असेल अशा कोणत्याहि घरांत, खोलींत किंवा जागेंत, आवश्यक असेल तितक्या इसमांच्या साहाय्यानें रात्रीं किंवा दिवसा व आवश्यक असल्यास बळाचा उपयोग करून प्रवेश करणें ;

(ब) अशा रीतीनें प्रवेश केलेल्या घरांत किंवा खोलींत किंवा जागेंत जुगाराची साधनें लपविली आहेत असा संशय घेण्यास त्यास कारण असेल तेंव्हा त्या घराचे, खोलीचें किंवा जागेच्या सर्व भागांचा व तसेंच तेथें सांपडतील ते इसम—मग असें इसम त्यावेळीं प्रत्यक्ष जुगार खेळत असो वा नसो—यांची झडती घेणें ;

(क) अशा सर्व इसमांस अभिरक्षेंत ठेवणें व त्यांना फौजदारी न्यायाधिशापुढें आणणें ;

(ड) ज्यांचा जुगार खेळण्यासाठीं उपयोग केला आहे किंवा उपयोग करण्याचा इरादा आहे असा संशय घेण्यास वाजवी कारण असेल अशा व ज्या वस्तू त्या ठिकाणीं सांपडल्या असतील अशा सर्व वस्तू जप्त करणें, हें, विधि संमत असेल.

परंतु, कोणत्याहि अधिकाऱ्यांस, संबधित पोलीस कमिशनर, फौजदारी न्यायाधीश, जिल्हा सहाय्यक पोलीस अधीक्षक किंवा उप-अधिक्षक याची त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर, उक्त घराचा खोलीचा किंवा जागेचा जुगार खेळण्याची सार्वजनिक जागा म्हणून उपयोग करण्यांत येत आहे असा संशय येण्यास सबळ आधार आहे अशी खात्री झाल्याशिवाय कोणत्याहि अधिकाऱ्यास खास अधिपत्राव्दारें अधिकार देतां कामा नये.

खोटी नांवें व पत्ते देण्याबद्दल शिक्षा.

६-अ. या अधिनियमाच्या उपबधान्वयें कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशानें किंवा पोलीस अधिकाऱ्यानें प्रवेश केलेल्या जुगाराच्या अड्ड्यांत आढळलेल्या कोणत्याहि इसमांस अशा कोणत्याहि अधिकाऱ्यानें अटक केल्यावर किंवा कोणत्याहि फौजदारी न्यायाधिशापुढें आणल्यावर, आणि अशा अधिकाऱ्यानें किंवा फौजदारी न्यायाधिशानें त्यास आपलें नांव व पत्ता देण्यास सांगितलें असतां तो आपलें नांव व पत्ता देण्याचें नाकारील किंवा देण्यांत हयगय करील किंवा कोणतेहि खोटें नांव किंवा पत्ता देईल तर त्यास दोषी ठरविण्यांत

आल्यावर एक हजार रुपयांहून अधिक नसलेल्या दंडाची शिक्षा होईल व असा दंड न भरल्यास, किंवा प्रथमतः शिक्षा देणाऱ्या न्यायालयास योग्य वाटल्यास, चार महिन्यांहून अधिक नसलेल्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल.

**जुगार खेळण्यास सार्वजनिक अड्डा ठेवण्याचा किंवा त्यांत जुगार खेळण्याचा अनुमानिक पुरावा.**

७. कलम ६ अन्वयें प्रवेश केलेल्या कोणत्याहि घरांत, खोलींत किंवा जागेंत किंवा त्या खालींत, घरांत किंवा सांपडलेल्या कोणत्याहि इसमाजवळ जेव्हां कोणतेहि जुगार खेळण्याचें साधन जप्त करण्यांत आले असेल तेंव्हा व अशा रीतीनें जप्त करण्यांत आलेल्या कोणत्याहि इतर वस्तूच्या बाबतींत, अशा घरांत, खोलींत किंवा जागेंत ज्या पोलीस अधिकाऱ्यानें प्रवेश केला असेल त्या पोलीस अधिकाऱ्यानें अशा रीतीनें जप्त केलेली वस्तू ही जुगार खेळण्याचें साधन होय असा संशय घेण्यास वाजवी कारण आहे अशी न्यायालयाची खात्री होईल तर, असे जप्त केलेले साधन किंवा वस्तू हीं तद्विरुद्ध सिद्ध करण्यांत येईपर्यंत त्या घराचा खोलीचा किंवा जागेचा सार्वजनिक जुगार खेळण्यास वापरण्यांत येत असलेले घर या बाबतच, व त्यावेळीं त्या ठिकाणीं हजर असलेले इसम हे जुगार खेळण्यासाठीं हजर होते या बाबतचा, मग फौजदारी न्यायाधिशानें किंवा पोलिस अधिकाऱ्यानें किंवा त्यांच्यापैकीं कुणाहि एकाच्या आदेशान्वयें काम करणाऱ्या इसमानें प्रत्यक्ष जुगार खेळतांना पाहिले नसले तरी पुरावा असल्याचें समजले पाहिजे ;

परंतु—

ज्या अधिपत्रावरून किंवा आदेशावरून, कलम ६ अन्वय घरांत, खोलींत किंवा जागेंत प्रवेश करण्यांत आला त्या अधिपत्रांत किंवा आदेशांत, कोणताहि दोष असला तरीहि व न्यायालयाचें मतें असा दोष महत्त्वाचा नसेल तर, उपरिनिर्दिष्ट अनुमान करण्यांत आलें पाहिजे.

**जुगाराचा सार्वजनिक अड्डा ठेवण्याबद्दल किंवा त्यांत जुगार खेळल्याबद्दल दोषी ठरविण्यांत आल्यावर जुगार खेळण्याची साधनें नष्ट करण्याचा अधिकार.**

८. जुगाराचा सार्वजनिक अड्डा खुला ठेवण्याबद्दल किंवा वापरण्याबद्दल किंवा तेथें जुगार खेळण्याचा किंवा जुगार खेळण्याच्या कारणासाठीं त्या ठिकाणीं हजर असल्याबद्दल कोणत्याहि इसमास दोषी ठरविण्यांत आले असतां, दोषी ठरविणाऱ्या फौजदारी न्यायाधिशास, त्याठिकाणी सांपडलेल्या किंवा तेथें असलेल्या इसमाजवळ सांपडलेली जुगार खेळण्याची सर्व साधनें तात्काळ नष्ट करण्याविषयीं किंवा ती जप्त करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार आहे तसेंच उक्त फौजदारी न्यायाधिशास जुगार खेळण्याची साधनें नसतील अशी सर्व किंवा कोणतीहि पैशाबद्दलची तारणपत्रें व जप्त केलेल्या इतर वस्तु यांची विक्री करण्याविषयीं, त्यापासून झालेली प्राप्ति व तेथें जप्त केलेला सर्व पैसा, जप्त करण्यांत यावा असा आदेश देण्याचा अधिकार आहे किंवा त्यास स्वविवेकानुसार, अशा प्राप्तीचा व इतर पैशाचा कोणताहि हिस्सा तो ज्या इसमानें मिळण्याचा अधिकार आहे त्या इसमास देण्यांत यावा असा आदेश देण्याचा अधिकार आहे.

**दोषी ठरविण्यासाठीं पैसे लावून खेळल्याचा पुरावा देण्याची आवश्यकता नाहीं.**

९. कलम ४ व ५ च्या कोणत्याहि उपबंधाविरूद्धच्या कोणत्याहि अपराधाबद्दल एखाद्या इसमास दोषी ठरविण्यासाठीं, जुगार खेळतांना सांपडलेला कोणताहि इसम हा कोणत्याहि पैशाकरितां, पैजेकरितां किंवा बळतीकरितां खेळत होता असें सिद्ध करणें आवश्यक नाहीं.

**विवक्षित साक्षिदारांचा बचाव.**

१०. या अधिनियमाविरुद्ध जुगार खेळण्यांत कोणताहि इसम सामील असेल व जुगारासंबंधींच्या या अधिनियमाच्या कोणत्याहि उपबंधांचा भंग केल्याबद्दल कोणत्याहि इसमाच्या न्यायचौकशींत ज्याची फौजदारी न्यायाधिशापुढें साक्षीदार म्हणून जबानी घेण्यांत आली असेल आणि अशी जबानी घेतल्यानंतर फौजदारी

न्यायाधिशाच्या मतें ज्या गोष्टींसंबंधीं त्याची अशा रीतीनें जबानी घेण्यांत आली असेल अशा सर्व गोष्टींसंबंधीं ज्यानें आपल्या पूर्ण माहितीप्रमाणें खऱ्या व विश्वसनीय गोष्टी उघडकीस आणल्या असतील अशा कोणत्याहि इसमास त्यानंतर उक्त फौजदारी न्यायाधिशाकडून तशा आशयाचें एक लेखी प्रमाणपत्र मिळेल आणि अशा जुगाराच्या बाबतींत त्यावेळेपूर्वी त्यानें केलेल्या कोणत्याहि गोष्टीबद्दल त्यास या अधिनियमान्वयें सर्व खटल्यांतून मुक्त करण्यांत येईल.

**दंडाच्या रकमेचा काहीं भाग माहिती देणारास देणें.**

११. कलम ४ व ५ च्या उपबंधांअन्वयें कोणत्याहि प्रकरणाचा इन्साफ करतांना, फौजदारी न्यायाधिशास, उक्त कलमांपैकीं कोणत्याहि कलमाअन्वयें बसविण्यांत आलेल्या कोणत्याहि दंडाच्या रकमेच्या १/४ पेक्षां अधिक नसेल असा कोणताहि भाग किंवा कलम ८ अन्वयें धरलेल्या व जप्त करण्याचा आदेश दिलेल्या वस्तुंच्या उत्पन्नाचा किंवा पैशांचा कोणताहि भाग, गुन्ह्याचा पत्ता लावण्याच्या कामीं किंवा गुन्ह्याची चौकशी करण्यांत जे पोलीस अधिकारी नसतील अशा ज्या इसमांनी सहाय्य दिले असेल त्या इसमांमध्यें फौजदारी न्यायाधिशास योग्य वाटेल त्या रीतीनें बक्षिस म्हणून वांटून देण्यासाठीं, बृहन्मुंबईत, पोलिस कमिशनरकडे व इतर ठिकाणीं जिल्हा पोलीस अधीक्षक यांजकडे पाठविण्याबद्दल निदेश देण्याचा अधिकार आहे.

**सार्वजनिक रस्त्यांत जुगार खेळणें, पक्षी व जनावरें लढविणें याबाबतींत अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार.**

१२. पोलिस अधिकाऱ्यास :—

(अ) कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यांत किंवा हमरस्त्यांत किंवा ज्या ठिकाणीं लोक जात येत असतील किंवा जेथें जाण्या येण्याची परवानगी असेल अशा कोणत्याहि जागेंत ; कोणताहि इसम जुगार खेळतांना सांपडेल किंवा तो जुगार खेळत असल्या बद्दलचा वाजवी संशय येईल अशा इसमाला ;

(ब) कोणत्याहि सार्वजनिक रस्त्यांत किंवा हमरस्त्यांत किंवा ज्याठिकाणीं लोक जात येत असतील किंवा त्यांना जाण्यायेण्याची परवानगी असेल अशा कोणत्याहि जागेंत, कोणताहि इसम कोणतेहि पक्षीं किंवा जनावरें लढवितांना सांपडेल अशा इसमाला ;

(क) त्या ठिकाणीं हजर असलेला जो कोणताहि इसम पक्ष्यांच्या व जनावरांच्या अशा सार्वजनिक लढतीस मदत करील किंवा त्याकामीं प्रोत्साहन देईल अशा इसमाला ;

अधिपत्राशिवाय धरण्याचा व त्याची झडती घेण्याचा अधिकार आहे. असा कोणताहि इसम, त्यास दोषी ठरविण्यांत आले असतां, पराकाष्टा तीनशे रुपये दंडाच्या शिक्षेस किंवा पराकाष्टा तीन महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र ठरेल, आणि असा जुगार खेळणें हें कलम ३ मध्यें जुगार खेळणे या संज्ञेची जी व्याख्या केली असेल तींत उल्लेख केल्याप्रमाणें पैज मारणें, सट्टा खेळणें किंवा अशाच प्रकारचा कोणताहि व्यवहार असेल तेंव्हा अशा रीतीनें जुगार खेळतांना आढळेल असा कोणताहि इसम, त्यास दोषी ठरविण्यांत आलेअसता कलम ४ मध्यें उल्लेख केलेल्या रीतीनें व अशा मर्यादेपर्यंत शिक्षेस पात्र ठरेल आणि अशा इसमाजवळ सांपडेल असा सर्व पैसा जप्त केला पाहिजे.

**सांपडलेली साधनें जप्त करणें व त्यांचा नाश करणें.**

आणि अशा पोलिस अधिकाऱ्यास, अशा सार्वजनिक रस्त्यांत, हमरस्त्यांत, जागेंत किंवा शर्यतीचे मैदानांत किंवा पोलीस अधिकारी ज्या इसमांस अशा रीतीनें अटक करील अशा इसमाजवळ किंवा त्याचे जवळपास सांपडलेले सर्व पक्षीं, जनावरे व जी जुगार खेळण्याची साधनें असल्याबद्दल वाजवी संशय येत असेल अशा वस्तु जप्त करण्याचा अधिकार आहे, आणि फौजदारी न्यायाधिशास, अपराधी इसम दोषी ठरविण्यांत आला असतां अशी साधनें तात्काळ नष्ट करण्यांत यावीत आणि असें पक्षीं व जनावरे विकण्यांत येऊन त्यापासून मिळालेलें उत्पन्न जप्त करण्यांत यावे असा आदेश देण्याचा अधिकार आहे. जेंव्हा कोणत्याहि इसमाजवळ किंवा त्याचेपाशीं कोणतीहि वस्तु सांपडेल अशी वस्तु जुगार खेळण्याचें साधन आहे असा संशय घेण्यास पोलीस अधिकाऱ्यास वाजवी कारणें होतीं, अशी न्यायालयाची खात्री होईल तर, अशा परिस्थितींत, अशी वस्तु जुगार खेळण्याचे साधन होते आणि ज्या इसमाजवळ किंवा ज्याचेपाशी अशी वस्तु सांपडली तो इसम जुगार खेळण्याच्या कारणांसाठीं हजर होता याबद्दलचा, तद्विरुद्ध सिद्ध होई पर्यंत, पुरावा असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

१२-अ. पोलिस अधिकाऱ्यास, जुगार खेळण्यास मदत करण्याच्या किंवा तें खेळणें सुलभ करण्याच्या हेतूनें जो कोणताहि इसम कोणतेंहि वर्तमानपत्र, बातमीपत्र किंवा कोणतीहि बातमी किंवा माहिती छापील, विकील, वांटील किंवा कोणत्याहि रीतीनें प्रसृत करील अशा कोणत्याहि इसमांस अधिपत्राशिवाय अटक करण्याचा अधिकार आहे. कोणतीहि बातमी किंवा माहिती छापणें, प्रसिद्ध करणें किंवा वांटणें याबद्दल अधिपत्रा शिवाय अटक करण्याचा अधिकार.

असा कोणताहि इसम, त्यास दोषी ठरविण्यांत आले असतां कलम ४ मध्यें उल्लेख केलेल्या रीतीनुसार व त्या मर्यादेपर्यंतच्या शिक्षेस पात्र ठरेल.

कोणत्याहि पोलीस अधिकाऱ्यास, ह्या कलमा अन्वयेंचा गुन्हा करण्याच्या कारणांसाठीं उपयोग करण्याचा किंवा उपयोग करण्याचा हेतू असल्याबद्दलचा ज्या वस्तुबाबत वाजवी संशय येत असेल अशा सर्व वस्तु जप्त करण्याचा व त्या जप्त करण्याच्या कारणांसाठीं कोणत्याहि जागेंत प्रवेश करण्याचा व त्या जागेची झडती घेण्याचा अधिकार आहे.

१३. ह्या अधिनियमांतील कोणताहि मजकूर, ज्या खेळांत केवळ कौशल्य असते अशी खेळ ज्या ज्या ठिकाणीं खेळण्यांत येईल त्या खेळास लागू होतो असें समजतां कामा नये. ज्या खेळांत केवळ कौशल्य असते, अशा खेळांचा बचाव.

१४. जुगाराबाबत अधिनियम, १३०५ फसली, मुंबई राज्याच्या विदर्भ विभागास लागू करतांना सार्वजनिक जुगाराबाबत अधिनियम, १८६७, सौराष्ट्र राज्य (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करण्याबाबत) अध्यादेश, १९४८ यान्वयें सौराष्ट्र प्रदेशांस लागू केलेला मुंबई जुगार खेळण्यास मनाई करण्याबाबत अधिनियम, १८८७ आणि कच्छ (कायदे लागू करण्याबाबत) आदेश, १९४९ यान्वयें कच्छ प्रदेशांस लागू केलेला मुंबई जुगार खेळण्यास मनाई करण्याबाबत अधिनियम, १८८७ हे याद्वारें रद्द करण्यांत येत आहेंत : रद्द करणें व बचाव.

परंतु, असे अधिनियम रद्द केल्यामुळें—

(अ) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमाचा पूर्वीचा अंमल, किंवा

(ब) अशा रीतीनें रद्द केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें संपादन केलेला, मिळालेला किंवा प्राप्त झालेला कोणताहि हक्क, विशेष अधिकार, बंधन किंवा जबाबदारी यांस, किंवा

(क) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमांच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधाविरुद्ध केलेल्या कोणत्याहि अपराधाच्या बाबतींत दिलेली शास्ति, जप्ति किंवा शिक्षा यांस, किंवा

(ड) वर निर्दिष्ट केलेला असा कोणताहि हक्क, विशेष अधिकार, बंधन, जबाबदारी, दंड, जप्ति किंवा शिक्षा यांच्या बाबतींत कोणतीहि चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना,

यास बाध येणार नाहीं आणि मुंबई जुगार खेळण्यास मनाई करण्याबाबत (व्याप्ति वाढविणें व सुधारणा) अधिनियम, १९५९ हा संमत झाला नव्हता असें समजून कोणतीहि अशी चौकशी, कायदेशीर कारवाई

किंवा उपाययोजना करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अमलांत आणतां येईल व कोणताहि असा दंड किंवा अशी शिक्षा देतां येईल :

तसेंच अशा रीतीनें रद्द झालेल्या अधिनियमाच्या उपबंधाद्वारें किंवा तदन्वयें केलेली कोणतीहि गोष्ट किंवा केलेली कोणतीहि उपाययोजना ही (यांत दिलेलीं अधिकार-पत्रें, दिलेले अधिकार, दिलेले आदेश व दिलेलें संरक्षण यांचाहि समावेश होतो) ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वयें केलेली गोष्ट किंवा केलेली उपाययोजना आहे असें समजलें पाहिजे आणि ह्या अधिनियमान्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीद्वारे किंवा केलेल्या उपाययोजनेद्वारें तींत बदल करण्यांत येईपर्यंत, ती रद्द करण्यांत येईपर्यंत किंवा तींत सुधारणा करण्यांत येईपर्यंत ती त्याप्रमाणें अमलांत राहील.

अनुसूचि

[रद्द केलेले अधिनियम]

[सन १८९५ चा मुंबई अधिनियम १६ अन्वयें रद्द करण्यांत आली.]